श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] फाल्गुन शके १८४५ [ अंक १२ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

श्री साईलीला कचेरी ५ इंदौर रोड बांद्रा, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... | १०६-११९ |
| स्फुट विषय ... ... .. ... | ९१-१०० |
| महाराजांची बोधपद्धति ... ... ... | ९-१२ |
| श्री साईसच्चरित ... ... ... | २५९-२७० |


---

सालाबादप्रमाणें श्रीसच्चिदानंद सद्‌गुरू आधुनिक संत चूडामणी समर्थ श्रीसाईबाबा ( संस्थान शिर्डी तालुके कोपरगांव, जि. नगर ) यांचा श्रीरामजयंतीचा उत्सव ता. १३ एप्रील सन १९२४ इ. चैत्र शुक्लपक्ष ९ शके १८४६ रोजीं शिर्डी येथें होणार आहे. तरी समर्थांच्या भक्तमंडळींनी व मोक्षेच्छु जनानीं निजहितार्थ महाराजांच्या पवित्र चरणांचे दर्शनासाठीं व तीर्थप्रसादासाठीं आपल्या मित्रमंडळीसह अवश्य येण्याचें करावें. कळावें.

## उत्सवाचा कार्यक्रम.

**शनिवार**-ता. १२-४-२४ चैत्र शु॥ ८ उत्सवास आरंभ.

**रविवार**-ता. १३-४-२४ सकाळीं अभिषेक, दोनप्रहरीं बारा वाजतां जन्मोत्सव सायंकाळीं निशाणाची मिरवणूक.

**सोमवार**—ता. १४-४-२४ सकाळीं मल्लांच्या कुस्त्या, दोनप्रहरीं तीन वाजतां कीर्तन, रात्रौ दारूकाम.

**मंगळवार**—ता. १५-४-२४ कीर्तन व रात्रौ श्रींच्या पालखीची मिरवणूक.

**बुधवार**—ता. १६-४-२४ द्वादशीचें भोजन. काला व तीर्थप्रसाद.

सर्व मंडळीच्या तर्फे सर्व संतांचा चरणरज.

'दासगण'

## खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधी कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा कीं, शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावीं. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकात विषमता दिसल्यास म्हणजे २६ पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ ते ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्ठांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनीं करून घेऊं नये.

2731'07

६०

श्री० रा० रा० कृष्णाजी नारायण उर्फ छोटू भय्यासाहेब पल्लळकर ऑनररी म्याजिस्ट्रेट साहेब हर्दा यांजकडून श्री० रा. रा. हरी सीताराम दीक्षित यांजला ता० ११।२।२४ रोजी आलेले पत्रांतील उतारा:—

श्रीसमर्थ यांच्या कृपेनें माझा एक रोग गेला त्याची हकीगत आपणास लिहीत आहें, ती अशी:—

मला आम्ल पित्ताची बिमारी होती ती अशी कीं, दुपारीं जेवण जाहलें म्हणजे तावडतोब उलटी होऊन आम्लपित्त पडण्याचें व त्याच प्रमाणें रात्रींही जेवलोंकी तें उलटून पडावयाचें ह्याकरितां पुष्कळ डॉक्टर व वैद्यांचीं औषधें घेतलीं परंतु कांहीं गुण आला नाहीं. कांहीं दिवसांनीं आमच्या वडीलांचे स्नेही सदाशिवराव रामचंद्र पटवर्धन ह्यांनी उत्कृष्ट नामांकित वैद्य नागपूराहून पाठविले व ह्यांचें औषध घेण्याबद्दल शिफारस केली. ते वैद्य जसे नामांकित तसे वयातीतही होते. हरद्यास ते आले व त्यांनीं मला औषध केलें. पहिल्या दिवशीं त्यांनीं ३ पुडया घेण्याला सांगितलें त्याप्रमाणें सकाळीं एक व दुपारीं एक अशा २ पुडया घेतल्या. दुपारीं तीन वाजेपासून शौच्यास होण्याला सुरवात जाहली. ती इतकी कीं, रात्रीं आठ वाजतां बिछान्यावरून उठण्याची शक्ती राहिली नाहीं. त्यावरून वैद्यबुवा व घरांतील मंडळी घाबरून गेली. नंतर वैद्यबुवा आमचे देवघर आहे तेथें जाऊन कांहीं वेळ त्यांनीं देवाची प्रार्थना केली व नंतर शौच्यास बंद होण्याचें औषध दिलें. रात्रीं अकरा वाजतां शौच्यास जाण्याचें बंद झालें. नंतर त्यांनी आमचे वडीलांना असें सांगितलें कीं, आजपासून आपण त्यांना आम्लपित्ताच्या व्याधीवर कोणताही इलाज करूं नका ही व्याधी सत्पुरुषाच्या कृपेनें बरी होईल त्या दिवसापासून मी कोणाचेंही औषध घेतलें नाहीं. त्यानंतर ५।६ वर्षांनी शिरडीस श्रीसमर्थांचें दर्शन जाहलें, त्यावेळीं मी किंवा माझ्या

सोबत्यापैकीं कोणी समर्थापुढें ह्या व्याधीची हकीगत सांगितली नाहीं. नंतर दुसरे वर्षी गुरूपौर्णिमेला आम्ही पुन्हां शिरडीस गेलों. गुरुपौर्णिमा झाल्यानंतर तिसरे दिवशीं दुपारी ४-४॥ वाजतां मशिदीमध्यें मी व माझे बंधू नारायणराव व इतर २।३ मंडळी श्रीचरणाजवळ बसलों होतों इतक्यांत मावशीबाई मशीदींत आल्यावर त्यांना श्री समर्थांनीं विचारलें कां, "अगे मावशे इतका उशीर कां केला," त्या बोलल्या कीं "बाबा आपण ओकाला लावतां ह्यामुळें उशीर जाहला." त्यावर समर्थ हांसून बोलले कीं "तूं फार खातेस म्हणून ओकतेस." मावशीबाईनीं प्रार्थना केली कीं, "ओकल्यापासून माझा जीव त्रासून गेला आहे." त्यावर बाबा कांहीं वेळ स्तब्ध राहिले व पांच सात मिनीटांनीं माझेकडे बोट दाखवून तोंडानें म्हणाले कीं "ह्या भाऊलाही बरेच दिवसापासून ओकारी होत असते" त्यावर माझे बंधू नारायण ह्यांनीं प्रार्थना केली कीं, ह्याला बरेच दिवसांपासून ओकारीची बिमारी आहे. पुष्कळ उपाय केले कांहीं उपयोग जाहला नाहीं" त्यावर श्रीसमर्थांच्या तोंडातून असे शब्द निघाले कीं "ह्यावर औषध हेंच कीं आतां ह्याला ओकारीची बिमारी होणार नाहीं. त्या दिवसापासून आज ८।९ वर्षे जाहलीं तो आम्लपित्ताचा रोग नाहींसा जाहला. दहा बारा वर्षांचा रोग जो पुष्कळ औषधी करूनही बरा जाहला नाहीं, तो समर्थांच्या तोंडच्या या अक्षरासरसा समूळ नाहींसा जाहला. ही समर्थांची लीला किती अगाध आहे.

६१

एके दिवशीं महाराजांनीं वझ्यानां विचारलें 'तूं काय काम करीत असतोस? वझ्यांनीं उत्तर दिलें आपल्या मशिदींत काय काम असेल तें करीत असतों. त्यावर महाराज म्हणाले वाड्यांतही काम करीत जा. त्याचे दुसरे दिवशीं वाड्यांतील अति उपयोगी माणूस पंडित या नांवाचा होता तो अजारी पडला, तेव्हां महाराजांच्या आज्ञेचें वझ्यांना कौतुक वाटून त्यांनीं पंडिताचें सर्व काम आपण पत्करिलें व तो बरा होईपर्यंत आनंदानें केलें.

६२

डहाणूस हरिभाऊ कर्णीक नांवाचे गृहस्थ आहेत. ते सन १९१८ चे गुरु पौर्णिमेस शिर्डीस गेले होते. त्यांचे एक स्नेही निघण्याची परवानगी मागण्यास महाराजांकडे गेले त्यावेळीं हेही त्यांचेबरोबर गेले. त्यांच्या स्नेह्याला एका गृहस्थानें महाराजांकडून रजा देवविली व त्याच गृहस्थानें हरिभाऊंनाही रजा देवविली व लगेच त्यांना खालीं जाण्यास सांगितलें. खालीं गेल्यावर त्यांच्या मनांत महाराजांना एक रुपया द्यावा असें आलें. इतक्यांत वर असलेल्या गृहस्थानें आतां जा असें वरूनच सांगितलें. तेव्हां ते तसेच निघाले. ते नाशकास उतरले व तेथें एका देवळांत एक दिगंबर स्वामी असत त्यांचे दर्शनास गेले. स्वामींचे भोंवती मंडळीचा बराच गराडा होता. पण हरिभाऊ आंत शिरल्याबरोबर स्वामी एकदम उठले व हरिभाऊकडे जाऊन त्यांचे मणगट धरलें व माझा रुपया कोठें आहे आण असें म्हणून त्यांचेकडून रुपया घेतला. अशा तऱ्हेनें दक्षणा देण्याची त्यांची इच्छा महाराजांनीं तृप्त करून दिली.

६३

डॉ. मेहता या नांवाचे पारशी गृहस्थ सन १९२० पासून शिर्डीस येत असतात. महाराज देहधारी असतानां यांनां महाराजांचे दर्शन झालें नव्हतें, तरी पण त्यांना महाराजांनीं निरनिराळ्या वेळीं अनुभव दिल्यामुळें त्यांची श्रद्धा महाराजांचे चरणीं जडली आहे. दोन वर्षांपूर्वीं ते शिर्डीस आले होते, त्यावेळीं त्यांच्यावर हायकोर्टांत एक फिर्याद झाल्याचें त्यांनीं मला सांगितलें. त्यांनीं एका गृहस्थाला कांहीं कारणासाठीं पैसे न घेतां तीन हजारांची प्रामिसरी नोट लिहून दिली होती. त्या प्रामिसरी नोटीवरून त्या गृहस्थानें त्यांचेवर फिर्याद केली होती. मी त्याचेतर्फे तो खटला चालवावा असें त्यांचें म्हणणें होतें. मी काम करावयाचें सोडल्यामुळें मी त्यांनां माझे मित्र मि. माणेकलाल यांजकडे पत्र देऊन पाठविलें. त्यांनीं खटल्याची हकी-

गत ऐकून घेतल्यावर साक्षीदार कोण आहेत असें विचारलें. तेव्हां डाक्टर म्हणाले साक्षीदार कोणीच नाहींत. प्रामिसरी नोट लिहून दिली तेव्हां वादी आणि मी दोघेच होतों असें ते म्हणाले. तेव्हां अर्थातच खटल्याचें स्वरूप निराशाजनक आहे असें मि. माणेकलाल म्हणाले आणि आपसांत तडजोड करा असा त्यांनीं सल्ला दिला. डाक्टर म्हणाले " आपण कोर्टांत लढण्याचा प्रयत्न करून पहा. याउपर बाबांची मर्जी असेल तसें होईल." डाक्टरांच्या आग्रहास्तव मि. माणेकलाल यांनीं डाक्टरांची कैफियत तयार करून कोर्टांत दाखल केली. खटला सुनावणीस निघण्याचे तारखेचे पूर्वी त्यांनीं डाक्टरास दोन तीनदां येऊन भेटण्याविषयीं पत्रें लिहिलीं पण डाक्टर भेटले नाहींत.शेवटीं खटला ज्या सोमवारीं निघणार होता त्याचे आदले शनिवारीं म्हणजे दोन दिवस आधीं मि.माणेकलाल यांनीं मुद्दाम कारकून पाठवून डाक्टरांस आफिसांत आणविलें तेव्हां असें कळलें कीं, डाक्टर आजारी झाल्यामुळें पार्शी सानिटेरीयममध्यें होते आणि म्हणून ते येऊं शकले नव्हते. मि. माणेकलाल यांनीं फिरून डाक्टरांनां तडजोडीचा सल्ला दिला. तडजोड केली नाहीं तर सगळ्या रकमेचें व्याज व खर्च यासह हुकुमनामा तुमच्यावर खास होईल असें मि. माणेकलालनीं डाक्टरांना बजावलें. डाक्टर म्हणाले मी तडजोड करावयाला जाणार नाहीं,आणि नजजवळ द्यावयाला पैसे नाहींत आणि कांहीं झालें तरी माझी अब्रू जाणार नाहीं, ही माझी खात्री आहे. मला थोडया दिवसां पूर्वीच श्रीसाईबाबांनीं स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, मी तुझी अब्रू जाऊं देणार नाहीं आणि त्यांचा शब्द कधीं खोटा व्हावयाचा नाहीं. तेव्हां तुम्ही केस लढण्याचीच तयारी करा. त्यावर मि. माणेकलालनीं ब्रीफ तयार करण्यास घेतलें. त्यांनीं त्या दिवशीं रात्रीं आठ वाजेपर्यंत काम केलें आणि मग डाक्टरांस दुसरे दिवशीं रविवारीं घरीं येण्यास सांगितलें. दुसरे दिवशीं डाक्टर त्यांचे घरीं जाणार तोंच डाक्टराचे एक स्नेही त्यांचेकडे जाऊन म्हणाले" आम्ही या खटल्याची तडजोड केली आहे आणि ती तुम्ही कबूल केली पाहिजे. तुमच्याकडून ती कबूल करवि-

त्याशिवाय आम्ही येथून जाणार नाही. ती तडजोड अशी. वादीस तुम्ही एकंदर आठशें रुपये देण्याचें कबूल करावें, आणि तेही एकदम न देतां पन्नास रुपये महिन्याच्या हप्त्यानीं द्यावे. खर्च ज्याचा त्यानें सोसावा. अशा तऱ्हेची कन्सेंट डिक्री ( दोघांच्या अनुमतीचा हुकुमनामा ) कोर्टांतून घ्यावी. त्या मित्राच्या आग्रहावरून डॉक्टरनीं तडजोड कबूल केली, आणि त्याप्रमाणें दुसरे दिवशीं कोर्टांतून कन्सेंट डिक्री घेण्यांत आली. हप्त्याची रक्कम थोडी असल्यामुळें ती भरणें डाक्टरांच्या ऐपतींतली गोष्ट होती. अर्थात " मी तुझी अब्रू जाऊं देणार नाहीं " या महाराजांच शब्दांचा पूर्ण प्रत्यय सर्वांस आला.

६४

इ. स. १९१३ मध्यें मी बरेच महिनें सतत शिर्डीस राहिलों होतों. प्रथम एकटाच गेलों. मागाहून कुटुंब तेथें आलें पण मुलगा व पुतणी वांद्रास एका स्नेह्याच्या येथें ठेवलीं. कुटुंब तेथें आल्यानंतर दोनेक महिन्यांनी मुलगा अजारी झाला व माझ्या वांद्रेकर स्नेह्यांनीं आम्हीं निदान माझ्या कुटुंबानें तरी तेथें तावडतोब यावें अशा अर्थाचें आग्रहपूर्वक पत्र लिहिलें. त्यासंबंधानें महाराजांची आज्ञा मागितली तेव्हां कोणी जाऊं नये, मुलांनांच इकडे बोलवावें अशी आज्ञा झाली. मुलांची वार्षिक परीक्षा एक महिन्यानेंच व्हावयाची होती म्हणून माझ्या स्नेह्यानें त्यांना न पाठवितां परिक्षेपर्यंत येथेंच राहूं द्यावें व कुटुंबास तावडतोब पाठवून द्यावें असें फिरून आग्रहाचें पत्र लिहिलें. पुन्हां महाराजांची आज्ञा मागितली व मुलांनाच येथें बोलवावें अशीच आज्ञा झाली. त्याप्रमाणें मुलें शिर्डीस आलीं. मुलगा फारच अशक्त झाला होता. त्याच्या छातींत दुखूं लागलें होतें व डाक्टरांनी त्याचा अभ्यास बंद केला होता. पुतणीला खरूज झाली होती. मुलांच्या प्रकृतींचा विचार केला म्हणजे महाराजांची आज्ञा फार हिताची झाली असें स्पष्ट दिसत होतें. शिर्डीस कांहीं दिवस राहिल्यानें मुलांची प्रकृति चांगली सुधरली. पुढें वांद्राच्या स्नेह्याचें पत्र आलें कीं ता. २ नवेंबर रोजीं मुलांची परिक्षा व्हावयाची आहे तर त्यांना

तावडतोब पाठवून द्यावें. त्यासंबंधानें महाराजांची आज्ञा मागतांच "पाहूं" येवढेंच उत्तर मिळालें व मुलें तेथेंच राहिली. तिसऱ्या तारखेला पत्र आलें की कांहीं कारणामुळें परिक्षा लांबली व ती सहाव्या तारखेस होईल. त्याही वळेला महाराज "पाहूं" इतकेंच म्हणाले. पुन्हां दहावे तारखेस पत्र आलें कीं परीक्षा सहावीलाही झाली नाहीं पण तेराव्या तारखेस खास व्हावयाची आहे व मुलांना आणण्यासाठीं आम्ही उद्यां मुद्दाम मनुष्य पाठवूं. त्याप्रमाणें मनुष्य अकराव्या तारखेला आला व बाराव्या तारखेला त्याचे बरोबर महाराजांनीं मुलांना पाठविलें. तेरा, चौदा व पंधरा तीन दिवस परिक्षा झाली व दोन्ही मुलें पास झालीं. एवंच महाराजांचे आज्ञेप्रमाणें वागल्यानें त्यांच्या प्रकृती सुधारल्या आणि परिक्षाही पदरांत पडली. भा. कृष्णाजी।

६५

मी शिर्डीस असतांना एके दिवशीं रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास माधवराव देशपांडयांचे बंधू रा. बाप्पाजी सावळ विहिरीहून धावऱ्या धावऱ्या आले व कुटुंबास प्लेग झाला आहे ताप खूब आहे, दोन गांठी आल्या आहेत, लौकर चला असें म्हणूं लागले. माधवराव महाराजांची आज्ञा घेण्यास्तव गेले तेव्हां महाराज म्हणाले इतक्या रात्रीं जाऊं नये, उद्यां सकाळी जावें, सध्यां उदी पाठवून द्यावी. हें ऐकून बाप्पाजींचा फार हिरमोड झाला माधवराव अर्थात महाराजांची आज्ञा मोडून गेले नाहींत. नुस्ती उदी पाठवून दिली. दुसरे दिवशीं सकाळीं महाराजांची आज्ञा घेऊन माधवराव सावळ विहिरीस आपल्या गांवाकडे भावजयीच्या समाचारासाठीं गेले. महाराजांनीं परत लौकर येण्याविषयीं बजाविलें. तेथें जाऊन पाहतात तों बाईचा ताप उतरला होता, गांठीही बसून गेल्या होत्या आणि बाई चहा करीत बसली होती. अर्थातच माधवरावांना महाराजांचे आज्ञेप्रमाणें तावडतोब परत जातां आलें.

६६

एकदां रामचंद्र कोते पाटील मुंबईस गेले होते. त्यांच्या दोन दिवस आधीं नाना लक्ष्मण कुळकर्णी हे एका लग्नासाठीं मुंबईस गेले होते. ज्याच्याकडे नाना कुळकर्णी पाहुणे गेले होते ते गृहस्थ ग्रांटरोडवर राहतात एवढेंच रामचंद्र पाटलास ठाऊक होतें. तेवढ्या पत्यावर शोध लागणें शक्य नाहीं, असें रामचंद्र पाटलास मंडळीनी सांगितलें. पाटील म्हणाले माझे साई-बाबा खरे आहेत आणि ते माझी व नानांची गाठ घालून देतील याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं. इतकें बोलून पाटील बाहेर पडले व ग्रांटरोडच्या मोठ्या सडकेनें जाऊं लागले. थोडेसेच गेल्यावर नाना कुळकर्णी त्यांना समोरून येतांना दिसले. अर्थात् पाटलाच्या श्रद्धेप्रमाणें त्यांना फळ मिळालें म्हणजे बाबांनीं त्यांची व नाना कुळकर्ण्यांची गांठ घालून दिली.

६७

गोखले आडनांवाच्या एक बाई महाराजांची कीर्ति ऐकून दर्शनास आल्या. त्यांचा आणि काशीबाई कानिटकरांचा आप्त संबंध असल्यामुळे काशीबाईनी त्यांना दादासाहेब केळकरांचे नांवाचें पत्र दिलें होतें. गोखले बाई असा निर्धार करून आल्या होत्या कीं, महाराजांचे पायांजवळ तीन दिवस उपोषण करावयाचें. बाई येथें येण्याचे आदले दिवशीं बाबा दादा केळकरांजवळ म्हणाले आतां शिमग्याचा सण आला आहे माझीं पोरें उपाशीं राहतील काय ? मी कसा तशीं राहू देईन. बाई आल्यावर, दादाकडे जाऊन लगेच महाराजांचे दर्शनाला गेल्या. दर्शन करून बसल्यावर कांहीं वेळानें बाबा आपण होऊन म्हणाले आपल्याला उपास तापास कशाला पाहिजेत. आपण आपले दादाचे घरीं जाऊन तेथें पुरणाच्या पोळ्या कराव्या आणि खाव्या व दादाला व त्याच्या पोराबाळांनाही खाऊं घालाव्या दादाचें कुटुंब अस्पर्श असल्यामुळें स्वयंपाकासंबंधानें ते विवंचनेंतच होते इतक्यांत

महाराजांची वरील आज्ञा झाली. अर्थात् गोखले बाईनी आपला निर्धार टाकून देऊन मोठ्या प्रेमानें दादांचे येथें स्वयंपाक केला व सर्व मंडळीनां आनंदानें जेऊं घालून आपण ही जेवल्या.

६८

अनंतराव पाटणकर या नांवाचें दादाकेळकरांचे एक स्नेही पुण्यास असतात. त्यांना वेदांत विषयाची गोडी आहे व त्या विषयाचा व्यासंगही आहे. ते एकदां महाराजांचे दर्शनास आले. दर्शन घेऊन अनंतराव बसल्या-नंतर त्यानीं महाराजांस प्रार्थना केली महाराज मी पुष्कळ वाचतों पण मनाची स्थिरता होत नाहीं व मनाला समाधान नाहीं. महाराज म्हणाले एकदां एक सौदागर येथें आला. तव्हां एक बकरी नऊलेंडया हगली. त्यानें त्या उचलून नेल्या.या बोलण्याचा अनंतरावाला अर्थच कळला नाहीं त्यानी वाड्यांत परत आल्यावर दादानां विचारलें महाराज बोलले याचा अर्थ काय.दादा म्हणाले मलाही कांहीं ठाऊक नाहीं पण ह्या नऊ लेंडया म्हणजे नवविधा भक्ती असतील. त्या पदरांत बांधून नेण्याविषयीचा महारांजांचा उपदेश असेल. दुसरे दिवशी अनंतराव महाराजांचे दर्शनास गेले तेव्हां महाराजांनीं विचारलें नऊ लेंडया पदरांत बांधल्या काय ? अनंतरावांनीं चरणांवर मस्तक ठेविलें आणि प्रार्थना केली कीं, आपण कृपा करा म्हणजे त्या लेंडया हस्तगत होतील.महाराजांनीं अनंतरावास आशीर्वाद व आश्वासन दिलें. सारांश भक्तीशिवाय चित्ताची स्थिरता व समाधान होणें शक्य नाहीं.

६९

शिर्डीस रामगीरबुवा नांवाचे एक गोसावी राहातात त्यांना एकदां महाराजांनीं नानासाहेब चांदोरकरांकडे उदी घेऊन जाण्यास सांगितलें. नाना-साहेब त्यावेळीं जामनेर येथें मामलेदार होते. तेव्हां जामनेरला रेल्वे नव्हती जळगांवापर्यंत रेल्वेनें जाऊन तेथून पायवाटेनें जावें लागत असे. रामगीर

बुवाजवळ फक्त दोन रुपये होते. त्यांनीं महाराजांस म्हटले येवढयांत जामने-रपर्यंत कसें जातां येईल. महाराज म्हणाले बापुगीर ( या बुवानां महाराज नित्य बापुगीर म्हणून हाक मारीत ) तूं जा सगळी सोय होईल. हें बोलणें झालें तेव्हां माधवराव देशपांडे जवळ बसले होते. आज्ञेप्रमाणें बुवा निघाले. जळगांवापर्यंत १॥= भाडें पडलें. जवळ फक्त दोन आण्याचे पैसे राहिले. पुढें काय करावें या विवंचनेंत बुवा स्टेशनचे बाहेर पडले तों एक शिपाई " शिर्डीचे बापूगीर गोसावी कोण आहेत " असें विचारूं लागला. अर्थात बुवांनीं सांगितलें मी तो बापुगीर गोसावी. काय काम आहे?. त्यावर शिपायानें म्हटलें. मला नानासाहेब चांदोरकरांनीं टांगा घेऊन पाठविलें आहे . तर टांग्यात बसा आणि जामनेरला चला . बुवांना अर्थात फार आनंद झाला व त्यांना असें वाटलें कीं, महाराजांनीं माधवरावाकडून नानासाहेबांकडे खबर पाठविली असावी. बुवा टांग्यांत बसले व जामनेरास गेले. टांगा मामलेदार कचेरीपाशीं उभा केला आणि शिपायानें बुवांस आंत जाण्यास सांगितलें. बुवा लघुशंकेला बसले आणि उठल्यानंतर पाहातात तों टांगा घोडे टांगेवाला व शिपाई सगळे गुप्त जाहाल. आंत जाऊन विचारलें तों नानासाहेब घरीं असल्याचें कळलें. मग बुवा शोध करीत घरीं गेले आंत वर्दी जातांच नानासाहेबांनीं बुवांना बोलाविलें. बुवांनीं उदा नानासाबांचे समोर ठेविली. नानासाहेबांनीं ती घेऊन आपल्या कुटुंबास दिली त्याच वेळीं नानासाहेबांच्या मुलीला प्रसूति वेदना होत असून सुटका होत नव्हती. उदी त्या मुलीला पाजली व लावली व तीन मिनिटांचे आंत मुलगी सुखरूप बाळंत झाली. नानासाहेबांनीं बुवांची चांगली संभावना केली टांग्याविषयीं विचारतां आपण टांगा किंवा शिपाई पाठविला नव्हता, असें नानासाहेबांनीं सांगितलें. अर्थात ही सर्व महाराजांचीच लीला होती तेच टांगा घोडे टांगेवाला आणि शिपाई बनले होते.

७०

पार्ले येथें नारायण महादेव ठोसर या नांवाचे महाराजांचे भक्त राहतात. ते महाराजांची उपासना श्री हनुमान रूपानें करीत असतात व म्हणूनच त्यांनी बराच खर्च करून पार्ल्यास देऊळ बांधून त्यांत श्री हनुमंताची स्थापना केली. ही स्थापना ता. १ एप्रिल १९१८ रोजीं झाली. मूर्तीच्या वर "श्री." हें अक्षर कोरलें असून उजवीकडे "सांई" व डावीकडे "हनुमान अशीं अक्षरें कोरलीं आहेत. स्थापना पार्ल्यास झाली त्याच दिवशीं शिर्डीस महाराजांनीं बर्फी आणविली व मंडळीला आपल्या हातानें वाटली. इतकेंच नव्हे तर त्याच दिवशीं शिर्डीस महाराजांचे मशीदींत सत्यनारायणाची पूजा झाली, व प्रसाद सर्वांना वाटला गेला. अर्थात् तो दिवस पार्ल्यास जसा आनंदांत व प्रसाद वाटण्यांत गेला, तसाच शिर्डीसही आनंदांत व प्रसाद वाटण्यांत गेला.

७१

शिर्डीस दाजी वामन चितांबर या नांवाचे हेडमास्तर आहेत. ते येथें आल्यानंतर थोडे दिवसांनीं माझी त्यांची भेट झाली. तेव्हां ते म्हणाले ' मी आजपर्यंत शिक्षक या नात्यानें चांगली अब्रू कमाविली आहे पण ती सर्व येथें जाईल. येथली मुलें कांहींही अभ्यास करीत नाहींत. परिक्षेचे वेळेस कसें होईल असें त्यांना विचारलें तर सांगतात आम्हीं बाबांची उदी घेऊन येऊं आणि पास होऊन जाऊं. यानंतर पांच सहा महिन्यांनीं मुलांची वार्षिक परीक्षा झाली. त्यानंतर हेडमास्तर जेव्हां मला भेटले तेव्हां आपण होऊनच सांगू लागले " मुलांची वार्षिक परिक्षा झाली. त्यांनीं सांगितल्याप्रमाणेंच झालें. मुलें बाबांची उदी घेऊन आलीं आणि परीक्षेंत पास झालीं. शाळेचा रिझल्ट फार चांगला झाला.

७२

एकदां कांहीं मंडळी वाडयांत बसली असतां त्यांच्या पैकीं एकानें तेथें नसलेल्या एका व्यक्तीची निंदा चालविली होती. ती निंदा बरेच मंडळीस रुचली नाहीं. थोडया वेळानें तो निंदा करणारा गृहस्थ बाहेर शौच्यास गेला. नितक्यांत महाराजही लेंडीवर जावयास निघाले. ते वाडयापाशीं आले तेव्हां मंडळी त्यांचे पाय पडूं लागली. तेव्हां महाराजांनीं त्या निंदा करणाऱ्या गृहस्थाविषयीं मला विचारलें. ते म्हणाले अमका अमका कोठें आहे ? मी म्हटलें " ते परसाकडेला गेले आहेत. तो गृहस्थ परत आल्यावर मी त्याला सांगितलें कीं बाबा तुमची चौकशी करीत होते. तेव्हां तो गृहस्थ म्हणाला " बाबा मला भेटले व त्यांनीं मला एक डुक्कर दाखविलें. त्याचें तोंड सगळें विष्टेनें भरलें होतें. बाबा म्हणाले-- पाहिलेंस तो किती मिटक्या मारून खात आहे, पण आपल्याला त्याची किळस येते. असेंच आपण कोणाची निंदा करूं लागलों कीं ती आपल्याला गोड लागते पण लोकांना किळस येते. आपण कोणाची निंदा करूं नये. तें वाईटच. "

७३

दक्षिण कानडपांत मुल्की या गांवीं रा. व्यंकटराव या नांवाचे गृहस्थ राहत. त्यांना महाराजांचा फोटो १९१६ च्या नाताळांत मिळाला व उदीही त्याचवर्षी मिळाली. त्यांचा जावई हायकोर्टांत वकीली करीत होता. तो एकाएकी कोठें नाहींसा झाला. इतकेंच नव्हे तर तो वारल्याची खबरही त्यांचेकडे आली. त्याच सुमारास त्यांचे एका स्नेह्यानें त्यांस महाराजांची माहिती दिली व महाराजांचा आशिर्वाद घेऊन जांवयाचा शोध करण्यास जाण्याविषयीं सुचविलें. त्यावेळेस दर्शनास जाण्यास त्यांनां सवड नव्हती, पण सुदैवानें त्यांना श्रीचा फोटो व उदी मिळाली. ती उदी त्यांनीं कपाळाला लाविली व महाराजांचे फोटोस साष्टांग नमस्कार घातला. हा

प्रकार मुंबईस झाला पण त्याचवेळेस त्यांची मुलगी जी मुल्की येथें होती तिला सात्विक विकार होऊं लागले व नंतर तिनें आपल्या वडिलांस पत्र लिहून विचारलें कीं अमुक दिवशी अमुक वेळेला तुम्ही कांहीं देवाचें किंवा संताचें आराधन करून मज संबंधानें आशिर्वाद मागत होतां कीं काय? अर्थात् व्यंकटरावांनीं झालला प्रकार कळविला व तेव्हांपासून त्यांची महाराजांवर श्रद्धा बसली. जांवयाचा शोध लागला नाहीं पण त्यानंतर जेव्हां जेव्हां त्यांनां कांहीं दुखणें येई तेव्हां तेव्हां महाराजांचे स्मरण करीत व त्यांच्या उदीचें सेवन करीत. थोडया दिवसांपूर्वी त्यांना Heart Disease चा झटका आला व त्यांत ते बेशुद्ध पडले. त्या बेशुद्धींत त्यानां महाराजांचें दर्शन झालें व महाराजांचे बरोबर त्यांचे दोन सेवकही होते. त्या सेवकांनीं व्यंकटरावांचे नको नको म्हणत असतां पाय चुरले व नंतर महाराज व त्यांचे सेवक अदृश्य झाले. त्यानंतर १९१८ च्या ईस्टरच्या सुटींत व्यंकटराव शिर्डीस महाराजांचे दर्शनास गेले व तेथें ते दोन सेवकही त्यांना दिसले व व्यंकटरावांनीं त्यांनां ओळखलें. व्यंकटरावाचा मोठा मुलगा प्रथम नास्तिक होता व आपल्या बापास वारंवार हंसत असे, पण पुढें तोच मुलगा महाराजांचा भक्त बनला व प्रत्येक अडचणीचे प्रसंगीं महाराजांचेकडे पत्र पाठवून त्यांचा आशिर्वाद मागवीत असे व अडचणी दूर झाल्याबद्दल त्याचीं पत्रें येत असत.

७४

एके दिवशीं दोनप्रहरीं मला महाराज म्हणाले "खुशाल[१]भाऊ पुष्कळ दिवसांत आले नाहींत. तूं टांगा घेऊन राहत्यास[२] जा व त्यांना घेऊन ये. त्यांना म्हणावें तुम्हाला बाबांनीं बोलाविलें आहे." त्याप्रमाणें

१ या नांवाचे एक श्रीमंत गृहस्थ साईबाबांच्या फार प्रेमांतले होते.

२ हा गांव शिरडी पासून सुमारें २ मैलांवर आहे.

मी टांगा घेऊन राहत्यास गेलों. खुशाल भाऊंची भेट झाली. ते म्हणाले. "मी दुपारीं जेऊन निजलों होतों. माझा डोळा लागला तोंच महाराज स्वप्नांत आले व मला म्हणाले शिर्डीस चल, त्याप्रमाणें मला येण्याची उत्कट इच्छा झाली पण आज माझे घोडे येथें नाहींत म्हणून मला येतांयेत नाहीं व म्हणूनच मी माझ्या मुलाला आतांच तिकडे पाठविला आहे." त्यावर मी म्हटलें "म्हणूनच महाराजांनीं मला टांगा घेऊन पाठविलें आहे. आपण येत असलात तर माझा टांगा तयार आहे." त्यावर ते मोठ्या आनंदानें मजबरोबर आले.

७५

गोविंदराव गद्रे या नांवाचे गृहस्थ नागपुरास होते. त्यांचा भाचा सुमारे दीड वर्षाचा फार आजारी झाला. डाक्टरांचे उपचार झाले पण गुण येईना. तेव्हां गोविंदरावांनीं महाराजांना नवस केला कीं मुलाला गुण पडला तर मी त्याला आपल्या दर्शनाला घेऊन येईन. महाराज नवसाला पावले. दुसरेच दिवसांपासून मुलाला गुण येऊन तो लौकरच साफ बरा झाला. त्यानंतर गोविंदरावांची बहीण कांहीं दिवस नागपुरास राहून आंपल्या सासरीं गेली. अर्थात् मूलही तिच्या बरोबरच गेलें. नवस फेडावयाचा तसाच राहून गेला. एक वर्षानंतर पुनः त्यांची बहीण त्यांचे घरीं गेली. त्यावेळेस गोविंदराव स्वतः आजारी पडले. औषधोपचार बराच झाला पण कांहीं गुण आला नाहीं. तितक्यांत गुरुवार आला आणि मंडळी त्यांचे येथें भजन करावयास बसली. भजन चाललें असतां नवसाचें स्मरण झालें व गोविंदरावांनीं बाबांची प्रार्थना केली कीं या दुखण्यांतून लौकर बरा झालों कीं तावडतोब भाच्याला घेऊन येतों. व त्याप्रमाणें ते एक दोन दिवसांतच बरे होऊन महाराजांचे दर्शनास गेले.

७६

पार्ल्याचे रा. कृष्णाजीपंत उर्फ अण्णासाहेब आगाशे व अंधेरीचे गोविंदराव ओक सर्वेअर असे दोघे मिळून महाराजांचे दर्शनास आले व तेथें दोन तीन दिवस राहून परत आले. येतांना दोघांनीं महाराजांचे दोन फोटो घेतले व एकाच ठिकाणीं बांधले. आगगाडींत गोविंदरावांना वाटलें आपण आणखी एक फोटो घेतला असता तर बरें झालें असतें म्हणजे तो कोकणांत आपल्या बंधूला पाठवितां आला असता. घरीं येऊन गाठोडें सोडून पाहतात तों त्यांस दोनच्या ऐवजीं तीन फोटो त्यांत सांपडले आपण दोनच घेतले असतां यांत तीन कसे निघाले याचें त्यांनां फारच आश्चर्य वाटलें व ही महाराजांचीच लीला आहे असा विश्वास त्यांचा होऊन ते त्या लीलेचें कौतुक करीत राहिले.

# दासगणूकृत आरती ( श्रीसाईबाबाची )

जय जयाजि महाराज जय जय गुरुबाबा साई ॥
परब्रह्म अवतार तूं या शतकाच्या ठाई ॥ ज० ॥
साई साई वदतां वाचे अघ अवघें विलया ॥
जाई ऐसा प्रभाव तव कीं हे सद्गुरुराया ॥
नाहीं शक्ती मजला किमपी तव गुण वानाया ॥
भाव धरुनी मात्र आलों शरण तुझ्या पाया ॥ ज० ॥ १ ॥
हीन दीन मी पातकि मोठा तसाच अज्ञानी ॥
म्हणुन समर्था देइ न मजला कदापि लोटोनी ॥
अधिभौतिक अध्यात्मिक तैशीं अधिदैविक जाणी ॥
दुःख संकटें वारि समर्था कृपाकटाक्षांनीं ॥ ज० ॥ २ ॥
शुकाचार्य तूं होउन मागें भागवत कथियेलें ॥
नामामृत तें कबीर होउन जगता पाजियलें ॥
शिर्डित येउन भ्रम निरसाया तैल जला केलें ॥
द्वय अंगुष्ठीं गंगा यमुना तीर्थां दाखविलें ॥ ज० ॥ ३ ॥
भावें चरणीं तव नत होतां अघटित तें घडतें ॥
गांठीं असल्या दुष्कृत तैंची सुकृत झणी होतें ॥
सूर्यागमनें जसें निशीला दिवसरूप येतें ॥
दासगणू हा सदैव घाली तुम्हांस दंडवत ते ॥ ज० ॥ ४ ॥

## श्री साईलीलेच्या या वर्षाच्या ९ वे अंकांत वर्णन केलेल्या श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांचे पांचवे पुण्यतिथीचे उत्पन्नाचा हिशोब

**जमा.**

६७७ वर्गणी
६५॥।-॥ श्रीची पेटी उघडली त्यांत आले तें
७।≡॥। रोख भिक्षा पुण्यतिथीचे दिवशीं
१३।=॥ गहूं मिळाले त्याची किंमत.
७६३॥=॥।

**खर्च.**

१।= प्रसादासाठीं लेबल खरेदी
॥।= लेबल छपाई
६ आमंत्रण कार्ड छपाई
३२ कंदिल जोडी १
३ कंदिलासाठीं मँनटल्स १ डझन
२। कंदीलाची नाझल ३
५ राम मारुती बुवांचे पुण्यतिथीचे वेळीं दक्षणा
७॥।-। गलेफाची फीत
२१ गलेफासाठीं साटीन
४८- निशाणासाठीं कापड
२ प्रसादासाठीं पिशव्या शिलाई
८= वही हिशोबासाठीं
११॥ पुण्याहून शेरा बहार आणविले-त्याची किंमत
-।- वरील रक्कम पाठविण्यासाठीं मनी-ऑरडर कमिशन
१८ आचारी यास दिले
२७ -॥।-॥ पोष्ट खर्च आमंत्रणें व प्रसाद वगैरे साठीं
८।≡ दक्षणा, जानवीं, पुजा खर्च वगैरे.
८ गाडी भाडें.
१४ चोजेवाले यांस दिले,
२।= सुतळी, मजरी
१- २८-
१५॥।= देवस्थानचे यांस
१५ मारुतीबुवांस दिले
५ सोपान यांस दिले
१६ तेल
१ घोड्याची ओवाळणी
२६३।≡ भोजन खर्च
१८= पेटींत सहा रुपये मोंगलाई आले त्यांचा वटाव दिला
४५३॥-॥। एकूण
२७०८= बाकी शिल्लक
७५३॥=॥।

## या मासिकाच्या १२ व्या अंकांत छापलेल्या कै. वा. रा. रा. दामोदर घनश्याम बाबरे यांच्या मृत्युपत्राचें प्रोबेट.

Value of the property being Rs. 13,380-14-9 stamp duty in the shape of stamps of the value of Rs. 307 has been levied under Act VII of 1870 (one impressed stamp of Rs. 300 and 2 adhesive stamps of Rs. 7 being hereto attached).

In the District Court of Thana Mis. C. application No. 25 of 1921. Civil Suit No. 18 of 1921.

Probate (under Act V of 1881).

I Dadiba C. Mehta Esquire, District Judge of the District of Thana hereby make known that on the 18th day of April 1923 the last will of Damodar Ghanshyam Babre late of Chinchni Taluka Dahanu of the Thana Collectorate copy whereof is hereto attached was proved and registered before me and that administration of the property and credits of the said deceased and in any way concerning the said will was granted to 1, Hari Sitaram Dikshit of Vile Parle 2, Govind Raghunath Dabholkar of Bandra, 3, Achut Narayan Khare of Dahanu, 4, Moreshwar Vishwanath Pradhan of Santacruz, 5, Laxman Ganesh Mahajani the executors in the said will named they having undertaken to administer the same and to make a true inventory of the said property and credits and to exhibit the same on or before the expiration of six months from the date of this grant and also to render to this court a true account of the said property and credits within one year from this date.

A copy of Sub-sections 1, 2 and 4 of Section 90 of Act V of 1881 is hereto annexed.

Given under my hand and the seal of the District Court Thana this 13th day of December 1923 one thousand nine hundred and twenty three.

(Signed) DADIBA C. MEHTA,

*District Judge, Thana*

Copy of Sub-Sections 1, 2 and 4 of Section 90 of Act V of 1881 to be attached to the probate.

(1) An executor or administrator, has subject to the provisions of this section power to dispose as he thinks fit, of all or any of the property for the time being vested in him under Section 4.

(2) The power of an executor to dispose of immoveable property so vested in him subject to any restriction which may be imposed in this behalf by the will appointing him unless probate has been granted the probate permits him by an order in writting notwithstanding the restruction to dispose of any immoveable property specified in the order in a manner permitted by the court.

(4) A disposal of property by an executor or administrator in contravention of Sub-section (2) or Sub-section. (3) as the case may be is voidable at the instance of any other person interested in the property.

True copy.

Signature unintelligible

*Clerk of the Court.*

'महाराजांचे अनुभव' या सदराखालीं वर्ष १ अंक १२ यांत पृ० १०५ वर अखेरीस ज्या मुलीची हकीगत दिली आहे तिला वेड लागण्याचे आरंभीं तिजकडून झालेले

# श्रीसाईनाथ गीत.

जाऊंया शिरडी पाहूंया साईला । जोडूनी करांला नमूं त्यातें ॥१॥
दीनांची माऊली कृपेची साऊली । करीतसे भली दासावरी ॥ २॥
अनाथांच्या नाथा साई जगन्नाथा । पदीं ठेऊं माथा आनंदानें॥३॥
भक्तांचा कैवारी दुष्टांसी संहारी । वसे गोदातीरीं आनंदानें॥ ४ ॥
बैसे गोणपटीं बोली बोले घाटी। भक्तांच्या संकटीं धांवे सदा ॥५॥
कफनी अंगांत चिलीमी फुंकींत। बोले आनंदांत साई माझा ॥६॥
जाहलासे वेळ न घालवा पळ। मोक्षाची ती कळ साईपाशीं ॥७॥
भक्तीला भुकेला कंठीं वैजयंतीं माळा।वांकवूंया भाला साईपायों ॥८॥
आनंदी आनंद साईचिदानंद । आम्ही मतिमंद तूझ्या पायीं ॥९॥
तोचि माता बंधू तोचि ज्ञान सिंधू। साईला या वंदूं आनंदानें॥१०॥
धांव पाव वेगें चरणीं नमीतें। विनंती करितें तूझ्या पायीं ॥११॥
बहूत प्रयासें नर देहा आलें। न सुटे हा मोह माया देवा ॥१२॥
काम क्रोध मोह मत्सर हे अरी।गातानी हो थोरी आम्हां पुढें॥१३॥
नको नको देवा तयांची संगती। असे ही विनंती माझे आई ॥१४॥
साईचें हो रूप असे अलोलीक। थकले कित्येक वर्णीतां हें॥ १५ ॥
सहस्र मुखांचा शेषही थकला। वर्णीतां हो लीला सद्गूरूची ॥१६॥
मयूरवाहीनी देवी नी शारदा। साईचा महीमा शिणली गातां ॥१७॥

त्यांच्यापुढें असें अज्ञ मी हें पोर। जोडूनियां कर बुद्धी मागें ॥ १८॥
अंगकांती असे केतकीच्या परी। विद्युल्लते परी नेत्र दोन्ही ॥ १९ ॥
भाल तें विशाल वाणी ती रसाळ। असे बहु मोल अलोलीक ॥२०॥
साईचें हो रूप असे मनोहर। गळां पुष्पहार विराजतो ॥ २१ ॥
गाणावरी बैसे सोडूनी चरण। जाऊंया शरण सद्गुरूला ॥ २२ ॥
धन्य ती शिरडी धन्य रहिवासी। नमती तयांसी मनोभावें ॥२३॥
न बाधे हो रोग ढोंगीयाचें ढोंग। दृष्टीसीं अनंग न राहेची ॥२४॥
व्यर्थ शिणवीली माऊली ते आम्ही।असो कुच कामी व्यर्थ जन्म॥२५॥
भक्त कार्यासाठीं वसे गोदाकाठीं।अवतीर्ण जगजेठी झाला असे॥२६॥
दर गुरूवारी करीताती वारी। नाहती गोदातीरीं आनंदानें ॥२७॥
धुवूनिया पाप टाके गोदा नदी। आनंदीआनंद तेथें असे ॥ २८ ॥
जयाचा हो भाव असे जया परी। कृपा तयावरी तैसी करी ॥२९॥
पापाचा हो ढीग होतसे दुभंग। साई पदीं दंग चित्त होतां ॥३०॥
निर्धनासी धन वांझेसी संतान। अज्ञानासीं ज्ञान साई देती ॥३१॥
साईनाथ गुरू असे कल्पतरू। तयाचें लेंकरूं दीन हें मी ॥ ३२ ॥
शिरडी हें गाव असे हो लहान। वैकुंठ भुवन भासे परी ॥३३ ॥
शिरडी वैकुंठा साई रमावर। जोडूनीया कर दास आम्ही ॥३४ ॥
आठ वाजतां हो जाती लेंडीवरी। भक्त वाटेवरी राहती ऊभे ॥३५॥
बहुत गांवींचे येताती हो जन। धरीती चरण मनोभावें ॥ ३६ ॥
अज्ञानानें धूतें पद तुझें साई। भक्तीपुष्प पायीं अर्पीतसें ॥ ३७ ॥
भावरुपी गंध लावीतें भालाला। पदकमलाला नमीतसें ॥ ३८ ॥
सांदीचिया ताटीं घेतें पंचारतीं। ओवाळितें प्रीती आनंदानें ॥ ३९ ॥

बुद्धी हा प्रसाद देई मसीं माते । वंदन करीतें अनंदानें ॥ ४० ॥
क्रोधरुपी घृत मोहरुपी वात । लोभ ही आरत ओवाळीतें ॥४१॥
उदबत्ती मत्सर कापूर तो काम।ओवाळीं गुण धाम आनंदानें ॥ ४२॥
कोणी पुत्रासाठीं कोणी धनासाठीं।कोणी मोक्षासाठीं करिती सेवा४३
कोणी तनमन अर्पीताती धन । कोणी आनंदानें करीती सेवा ॥४४॥
कोणी पुष्प माळा घालीत गळयांत। कोणी हो चुरीत पद त्यांचे॥४५॥
कोणी भक्ती भावें गाती साईनाथातें । पायावरी माथा ठेवीताती ॥४६
बारा हो वाजतां होतसे आरती । चौघडे वाजती ढुम ढुम ॥४७ ॥
आर्ती झाल्यावरी नैवेद्यांचीं ताटें । भक्त अर्पीतात सद्गुरूला ॥ ४८ ॥
कोणी शीरापुरी कोणी हो खिचडी । त्यावरीतीकढी दह्याची हो ४९
कोणी राघवदास मोतीचूर जिलब्या ।घेऊनिया उभ्या राहत नारी५०
कोणी जोंधळ्याच्या कोणी बाजरीच्या। कोणी पुरणाच्या पोळ्या देत
कोणी हो झुणका कोणी हो चपाती । आनंदानें देती साईनाथा॥५२॥
जयाचें सामर्थ्य असे जया परी। नैवेद्य तेवी करीं घेऊन येत ॥५३॥
सर्व तो नैवेद्य ठेवीत ताटांत । फकीरां वाटींत संध्याकाळीं ॥५४॥
नैवेद्याचा थाट आटोपल्यावरी । भक्तांचिया करीं उदी देत ॥५५॥
घेऊनीया उदी सप्रेमें हातांत । भक्त करीतात नमस्कार ॥ ५६ ॥
नमन करोनी उभे ते राहत । आशिर्वाद देती साईबाबा ॥५७॥
एक वाजतां हो भोजनासीं घरीं । जात नरनारी आनंदानें ॥५८॥
भोजन करूनी झोप ती हो घेत । आनंदानें जात मशीदींत॥५९॥
मशीद ती असे दहा माणसांची । बसण्या सोयीची खरोखरी॥६०॥

मशीदीमाझारीं जमत नरनारी। आनंदें चुरीत पद त्यांचे॥६१॥

कोणी एक म्हणे साईनाथ देवा । सिंहासना द्यावा मान जरा॥६२॥

तेव्हां साई म्हणे मी असें फकीर । सिंहासन थोर योग्य नोहे ॥६३॥

पूर्वी हो पासूनी माझें गोणपट । सिंहासनीचा थाट नाहीं बरा॥६४॥

आसन चांदीचें नसे योग्यतेचें । बरें तें पूर्वीचें गोणपट ॥ ६५ ॥

सिंहासन योग्य थोर भूपतीला । आम्हा गरीबांला कुच कामी॥६६॥

न बरा हो लोभ धनकनकाचा । ध्यावा वैकुंठीचा रमाधव ॥६७॥

कोण ती कोणाची माय ती भगीनी । सर्व रत धनीं असतातो॥६८॥

जोंवरी हो पैसा तों वरी हो बैसा । नाहींतरी सरसा दूर दूर॥६९॥

जग हें हो सारें मायेचा बाजार । यांस येर झार पुरे झाल्या॥७०॥

जग हें बाजार बाहुल्या नारीनर । कराया संसार अवतरल्या॥७१॥

म्हणा बाप माझा बंधुचुलता माझा । वृद्ध आजी आजा माझीं सर्व ७२

परो हो अंतीचा कोणीन सांगाती । वैकुंठीचा पती एक असे ॥७३॥

केलें असे हें मी करणार हें मी । परी लीन रामीं नसे कदा ॥७४॥

सर्व गेले वाया मी पणा माझारी । मायेच्या बाजारीं सर्व व्यर्थ॥७५॥

लक्ष चौऱ्यांशीचा घालूनीया फेरा । आला जन्म नरा बहु सायासें७६

परी नच केली आईबापांची सेवा । पुण्य मार्गभला न योजीला॥७७॥

अगणीत केल्या पापांच्या हो राशी । कैसें वैकुंठासीं स्थान मिळे॥७८॥

[illegible] थेंद । [illegible] पदांबुज्या वंदूं चला ॥ ७९ ॥

[illegible] संसार मायेचा बाजार । भूमीला हो भार होत असे॥८०

मागील जन्मीचें पुण्य होतें बहु । म्हणूनीयां देवू भेटलाहो ॥ ८१ ॥

ब्रम्हा विष्णुशीव मूर्ती एक झाली । नामें प्रकटली दत्तात्रय ॥८२॥

तोचि दत्तात्रय साईनाथ गुरू। तयाला हो स्मरूं रात्रं दीन ॥८३॥

शिरडी तें नभ साई दिनमणीं । प्रकाशाया जनीं अवतरला ॥ ८४॥
साई तो सागर आम्ही आहों मीन । त्याच्या आश्रयान आम्ही आलों
जाहला उशीर जाऊं दर्शनासीं । साईची येण्याची वेळ झाली ८६
लहान तीं वालें म्हणती वावा आले । मस्तक वांकविलें आनंदानें ८७
दर्शनाच्या साठीं गरदी जाहाली । धांऊनीया आलीं नारीनर॥८८
जाहली सांजती करुंया आरती । असें म्हणताती भक्त जन ॥८९॥
वाडयामध्यें सर्व भक्त ते जमती । करीती आरती आनंदानें ॥९०॥
म्हणती ते जन वहूत दिसांनीं । साईच्या कृपेनी भेट झाली ॥९१॥
वाजले हो दहा भक्त गर्जताती । चावडीवरी जाण्याची वेळ झाली९२
झटझटझट करीत भोजन । धांवले ते जन आनंदानें ॥ ९३ ॥
कोणी हो धरीती छत्र माथ्यावरी । कोणी दिवटी करीं घेती प्रेमें९४
कोणी म्हणताती चौरी मज करीं । द्याहो झडकरी वेळ झाला॥९५॥
ढाळीन चवरी आज वावांवरी । पहिल्यानें करीं घेतली मी ॥९६॥
वाजतो चौघडा सणयी ती वाजे । आनंदानें गर्जे साई साई ॥९७॥
ऐशा हो थाटानें चावडीच्यावरी । सुखें निद्रा करी साईनाथ॥९८॥
ऐशा परी साई निद्रित जं होत । गृहाप्रती येत भक्त सर्व ॥९९॥
वाजले हो पांच काकडआरती । शिंग पुकारती भक्त जन ॥ १००॥
जयजयजय साईनाथ देवा । आरतीला यावा मान जरा ॥१०१॥
तेव्हां साईनाथ रुद्ररूप धरी । घेऊनीया करीं काठीं धांवे ॥१०२॥
नसे तुम्हा काज नसे तुम्हा लज्या । चालते हो व्हा जा सर्व तुम्ही१०३
तेव्हां सर्व भक्तजोडूनीया कर । म्हणती कृपा कर साई देवा॥१०४॥
ऐशा परी झाली काकडआरती । भक्त सर्व येती नीज गृहा॥१०५॥
कोणी म्हणे धन्य महीमा साईचा । मजवाटे कमळेचा कांत हाच१०६

कधीं हो आनंदें म्हणती सर्वांना । चाळते तुम्हीन्हाना जळदीनें १०७
तेन्हां सर्व भक्त साईसी म्हणती । असती आम्हा प्रतीतात माय १०८
साईचीहीगीता प्रेमें जो गायील । त्याचीं पुरवील आस साई ॥१०९॥
निर्धनासी धन रोगीया आरोग्य । पापाचे ते ढीग फुटतील॥११०॥
कामक्रोध लोभ मोहादी षडरी । पळतातीदूरी साईकृपे ॥ १११ ॥
जो साईनाथाचे धरील चरण । मनोरथ पूर्ण होती त्याचे ॥११२॥
अज्ञानासी ज्ञान वांझेसी सतान । साईच्या कृपेनें मिळे साच ११३
भक्तिभावें गातो साईची जो गीता।त्याची सर्व चिंता जाळील तो११४
धन्य धन्य धन्य धन्य तें हो गांव । साईनाथ देव वसे जेथें ॥११५
साई माझी माता साई माझा पिता । साई जगन्नाथा नमीतसें११६
साई हो भगिनी साई बंधुराय । धरूं त्याचे पाय आनंदानें॥११७॥
भक्त कार्यासाठीं आला गोदा तटींत्याच्या पदीं मिठी घालूंचला११८
साईचा महीमा वाणी वर्णीतसें । बुद्धी देत असे साईनाथ ॥११९॥
साईनाथ गुरू असे कल्पतरू। तयाला हो स्मरूं रात्रंदिन ॥१२०॥
साईनाथ आई पदीं ने लवकाही । दासी लीन पायीं सदां असे१२१

रा. रा. गणेश दामोदर ऊर्फ दादा केळकर यांना महाराजांनी शिर्डी सच कायमचें ठेऊन घेतलें होतें, आणि त्यांचेंही मन येथें असें रमलें होतें कीं, कांहीं केल्या शिर्डी सोडून जावें असें त्यांना कधींही वाटेना. त्यांचें कुटुंब दोन वर्षांपूर्वी निवर्तलें, तरी ते एकटेच शिर्डीस राहत. त्यांचे मुलानें पुण्यास येऊन राहण्याविषयीं आणि त्यांच्या बहिणीनें वांईस येऊन राहण्याविषयीं पराकाष्ठा केली.पण दादा शिर्डी सोडून गेले नाहींत. मूळचीच प्रकृति साधारण अशक्त आणि अलीकडे बरीच वर्षे दमेकरी असल्यामुळें त्यांच्या अंगांत विशेष त्राण राहिलें नव्हतें, तरी श्रीसमर्थांचे समाधीपुढें रामायण व भागवत दोन तास नित्य वाचीत आणि नंतर मशीदींत जाऊन महाराजांच्या तसबीरीपुढें दोन तास अति प्रेमळ आणि मधुर भजन करीत. त्याशिवाय वाड्यांतही पहाटेस भजन करीत आणि दुपारीं पोथी वाचीत, एकंदरींत ते आपल्या काळाचा खरा खरा सद्व्यय करीत असत. त्यांना गेल्या जानेवारींत महाराजांनीं आपल्याजवळ नेलें. ते मूळ वांईचे राहणारे असून फार कर्मठ असत. ते एकादशी करीत असत. एका एकादशीला महाराजांनीं त्यांना बोलावलें आणि त्यांना म्हटलें "दादा, कोन्टाळयाला, जाऊन दोन बोकड घेऊन ये म्हणजे आपण त्यांची सागुती करूं" दादांनीं असलें काम कधीं केलें नव्हतें, तरी पण गुरूची आज्ञा शिरसामान्य करून, दादा कपडे घालायला घरीं गेलें. कपडे घालून दादा मशिदींत गेले तेव्हां महाराजांनीं त्यांना बोकड घेण्यासाठीं रुपये दिले आणखी जा असें म्हणाले. दादा महाराजांना नमस्कार करून निघाले. तें मशीदीच्या फाटकापर्यंत गेले तेव्हां महाराजांनी त्यांना फिरून हाक मारून म्हटलें "दादा तूं कशाला जातोस. तुझ्यावरोवर गडी आहेत त्या गड्यालाच पाठीव." दादा बरें म्हणाले आणि गड्याजवळ रुपये देऊं लागले तेव्हां महाराज म्हणाले "दादा अरे आज एकादशीना आणि तूं ब्राह्मण असून बोकड आणवून मला खाऊं घालतोस," आणि खूब हसले आणि म्हणाले "आपल्याला बोकड बिकड कांहीं नको." अर्थात् महाराजांना बोकडाची गरज नसून गुरुआज्ञेची युक्तायुक्तता

पाहावयाची नाहीं या तत्वाचा बोध ठसवावयाचा होता. महाराजांच्या कृपेनें दादांच्या मनावर हा ठसलाच होता पण महाराजांच्या वरील लीलेनें इतरांच्या मनावरही तो ठसला.

एकदां कांहीं तरुण मंडळी महाराजांचे दर्शनास आली होती. त्यांच्या मनांत महाराजांचा फोटो घेण्याची उत्कंठा होती, आणि त्यांनीं त्यासाठीं मुद्दाम क्यामेरा आपल्याबरोबर आणला होता. दोन दिवस राहिल्यानंतर त्यांनीं आपला हेतु रा. माधवराव देशपांडे यांस कळविला. महाराज लेंडीतून परत येतांना रावबहादुर साठयांच्या वाडयाजवळ आले म्हणजे त्यांना थोडें थांबण्यास विनंती करावयाची आणि तेवढयांत महाराजांचा फोटो मंडळीनीं घ्यावयाचा असा घाट माधवरावांनीं घातला. त्याप्रमाणें क्यामेरा तयार करून मंडळी आणि त्यांचेजवळ माधवराव, महाराजांची वाट पाहत उभे राहिले. महाराज आल्याबरोबर माधवरावांस म्हणाले " श्यामा ( माधवरावांना महाराज पुष्कळदां श्यामा किंवा श्यामराव या नांवानें हाक मारीत ) हें काय आहे. माधवराव म्हणाले " देवा या मंडळीच्या मनांत तुमचा फोटो घ्यावा असें आहे तर क्षणभर उभें रहा " महाराज म्हणाले " या पोरांना सांग फोटोबिटो कांहीं घेऊं नका. भिंत पाडा म्हणजे झालें " असें म्हणून महाराज न थांबतां निघून गेले. अर्थात् फोटो घ्यावयाचा तो महाराजांच्या साडेतीन हात देहाचाचा होता. तो देह म्हणजे महाराजांचें खरें रूप नसून अविद्यात्मक द्वैताच्या भिंतीनें कोंडलेला भासमान देह होता. ही द्वैताची भिंत पाडल्याशिवाय महाराजांचें खरें रूप समजणें शक्य नाहीं. ती भिंत पाडून महाराजांच्या खऱ्या रूपाचें चित्र भक्तानें आपल्या हृत्पटलावर उठवावें हें महाराजांच्या शब्दाचें रहस्य असावें असें वाटतें.

एकदा मुंबईच्या एका नामांकित फोटोग्राफरच्या स्टुडिओमध्यें कांहीं वर्षें काम केलेले एक प्रभु गृहस्थ महाराजांच्या दर्शनास आले होते. त्यांनींही महाराजांचा फोटो काढण्याच्या हेतूनें आपल्याबरोबर क्यामेरा आणला होता

श्र महाराजांना कांहीं न सांगतां फोटो घ्यावा अशी त्यांची इच्छा होती त्याप्रमाणें त्यांनीं फोटो घेतला, पण जेव्हां कांचेवर फोटो उमटला तेव्हां त्यांत महाराजांचा चेहरा नसून फोटो काढणाराच्या गुरूचा चेहरा उमटला. हा अलौकिक चमत्कार पाहून त्यांना मोठें कौतुक वाटलें आणि आपलीच उपासना आपण कायम ठेविली पाहिजे, असा त्यांनीं महाराजांच्या या लीलेपासून बोध घेतला.

शिर्डीस कांहीं महिने येऊन राहिलेल्या एका गृहस्थाचे मनांत असाच गुप्त रीतीनें महाराजांचा फोटो घेण्याचें आलें व तो त्यानें महाराज लेंडीवर जातांना साठे साहेबांच्या वाड्याजवळ उभे असतांना घेतला. त्या फोटोंत महाराजांजवळ असलेली इतर मंडळी चांगली निघाली असून महाराजांचे फक्त पाय निघाले. अर्थात् भक्तानें फक्त पायावरच दृष्टि ठेविली पाहिजे असा जो आपला वेदशास्त्रांचा सिद्धांत आहे, तो या लीलेनें दृढ झाला. पाय हे देहाचे अधिष्ठानरूपी आहेत आणि नित्य लक्ष, भासणाऱ्या देहाकडे न लावतां अधिष्ठानाकडे लावलें पाहिजे. जसे मासे धरणाऱ्या कोळ्याच्या जाळ्यांत त्याच्या पायाजवळ असलेले मासे सांपडत नाहींत तसे देवाच्या पायाजवळ असलेले प्राणी त्याच्या मायाजाळ्यांत सांपडावयाचे नाहींत. महाराजांच्या आरतीचे वेळीं म्हटल्या जाणाऱ्या संस्कृत अष्टकांतही माझें मन आपल्या चरणयुगुलीं रमो हेंच मागणें मागितलें आहे " रमेन्मनो मे तव पादयुग्मे."

माझे एक मित्र लहानपणीं मुंबईस असत. त्यांचा माधवबागेंतील श्रीलक्ष्मीनारायणाचे मूर्तीचे दर्शनास जाण्याचा नित्य नेम असे. कांहीं दिवसांनीं ती मूर्ती त्यांच्या ध्यानांत प्रगट होऊं लागली. कांहीं वर्षांनंतर त्यांना शिर्डीस महाराजांचे दर्शनास येण्याचा योग आला आणि ते वेळोवेळीं शिर्डीस येऊं लागले. असें त्यांचें येणें बरेच वेळा घडल्यानंतर एकदां असें झालें कीं, त्यांचे ध्यानाचे वेळीं श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति प्रगट न होतां महाराज प्रगटूं लागले. त्यावेळीं त्यांस अतिशय वाईट वाटूं लागलें आणि आजपर्यंत आपण दृढ केलेली आपली उपासना सुटत चालली असें मनांत येऊन ते फार खिन्न झाले आणि आपली पूर्वीची उपासना कशी कायम राहील या विवंचनेंत

ते पडले. यानंतर लवकरच त्यांना शिर्डीस येण्याची फिरून संधी आली. ते महाराजांचें दर्शन घेऊन बसतांक्षणींच महाराज म्हणाले " अरे खिन्न कां व्हावें. त्या मूर्तीत आणि आपल्यांत भेद कां मानावा ? आपणही तेच आहोंत, ध्यानांत ती मुर्ति आली काय किंवा आपण आलों काय एकच ?" अर्थातच महाराजांच्या या शब्दांनीं माझ्या मित्राचे मनाची तळमळ शांत झाली, आणि सद्गुरु आणि परमात्मा एकच, दोहोंमध्यें भेद मानूं नये या भागवतांतील तत्वाची खूण पटून त्यांना आनंद झाला. त्यानंतर त्यांच्या ध्यानांत नित्य महाराजांचीच मूर्ति येऊं लागली आणि तीच दृढ झाली. असें एक वर्ष गेल्यानंतर माझ्या मित्राची बदली पंढरपुरास झाली. तेव्हां ते पुन्हां घोटाळ्यांत पडले. पंढरपुरास जाऊन देवदर्शनाला जावयाचें नाहीं हेंही अयोग्य आणि जावयाचें तर आपल्या आतां इष्ट बनलेल्या उपासनेला व्यत्यय येण्याची भीति वाटे. अशा मनाच्या स्थितीत महाराजांचें दर्शन घेऊन जावें असें त्यांच्या मनांत आलें. ते शिर्डीस येऊन पोहोचण्याचे जरा आधीं महाराजांनीं " आपल्याला पंढरपुरास जावयाचें आणि तेथें राहावयाचें " असे उद्गार काढले, जवळ बसलेल्या मंडळीस या बोलण्याचा खुलासा होईना. तों दहापांच मिनिटांनीं माझे मित्र येथें येऊन पोहोचले आणि पंढरपुरास बदली झाली, " असून मी तेथें जात आहें असें बोलले. अर्थातच महाराजांच्या बोलण्याचा उलगडा मंडळीस असा झाला कीं, महाराज आपल्या भक्तांजवळ नेहमीं असतात त्याप्रमाणें या भक्ताबरोबर पंढरपुरासही राहतील. महाराजांनीं माझ्या मित्राला सांगितलें " तूं पंढरपुरास आनंदानें जा. तेथें जाऊन देवाचें दर्शन घे. तेथेंही आपणच आहोंत." या शब्दांनीं माझ्या मित्राला समाधान वाटून ते आनंदानें पंढरपुरास गेले. तेथें गेल्यावर श्रीपांडुरंगाचे दर्शनास गेले तों देवळांत त्यांना श्रीपांडुरंगाची मूर्ति न दिसतां महाराज दिसले. त्याबरोबर त्यांना गहिंवर दाटून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा चालल्या. अर्थात् प्रसिद्ध भक्त नरहरि सोनारासारखें त्यांचे मनांतील द्वैताचें पूर्ण निरसन झालें.

# अध्याय १५ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ।

श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ।

श्रीसद्गुरूसाईनाथायनमः ॥

फळलीं जयांची पुण्यें अगाधें । तयांसींच साई दर्शन लाधे ॥
त्रिविध ताप तया न बाधे । साधन साधें परमार्था ॥ १ ॥

कृपा करा जी श्रोतेजन । क्षणैक करोनी निजगुरुचिंतन ॥
कथेसी करा सादर मन । द्या अवधान मजकडे ॥ २ ॥

आहांत तुम्ही ठावे आम्हां । व्यर्थ परिश्रम कांहे तुम्हां ॥
ऐसें न म्हणा करा क्षमा । उपमा तुम्हां सागराची ॥ ३ ॥

भरला जरी अपरंपार । तरी न सरिते परतवी सागर ॥
घन वर्षतां सहस्रधार । तयास ही थार देई तो ॥ ४ ॥

तैसे तुम्ही श्रोते सज्जन । तुम्हामाजीं करावें मज्जन ॥
इच्छा धरिली न करा तर्जन । दीन वर्जन वरवेंना ॥ ५ ॥

येवो गंगेचें जळ निर्मळ । अथवा गांवीचा लेंड ओहोळ ॥
सागरापोटीं दोहींसीं स्थळ । संगमीं खळमळ विरहीत ॥ ६ ॥

म्हणोन तुम्हा श्रोतियां चित्ता । संत कथाश्रवणीं जे आस्था ॥
तेच स्वयें पावेल साफल्यता । कृपेनें पाहतां मजकडे ॥ ७ ॥

संबूरी आणि श्रद्धायुक्त । सादर सेवितां हें कथामृत ॥
आतुडेल भक्ति प्रेम युत । श्रोते कृतकृत्य होतील ॥ ८ ॥
भक्तां सहज परम प्राप्ति । श्रोतयां भक्ति आणि मुक्ति ॥
भावार्थियां सौख्य शांती । निज विश्रांती सकळिकां ॥ ९ ॥
गुरुमुखींच्या गोड कथा । ऐकतां निरसेल भवभय व्यथा ॥
होईल आनंद श्रोतियांच्या चित्ता।स्वयें निजात्मता प्रकटेल ॥१०॥
ये अध्यायीं निरूपण । प्रेमळ भक्तांचें साईस प्रार्थन ॥
दर्शन देऊनि साई प्रसन्न ॥ होती कैसेनी त्या परिसा ॥ ११ ॥
नुकतीच पाजूनी गेली बाहेरी ॥ मागुतेनी आली जरी मार्जारी ॥
तरी फिरफिरोनि पोरें तिजवरी ॥ धांवती प्रेमभरीं लुंचावया॥१२॥
मग ते कंटाळुनी गुरगुरे ॥ क्षणैकजरी दबती पोरें ॥
आई निवांतबैसली पुरे ॥ घालोनी भंवरें लुंचती ॥ १३ ॥
लुंचतां ढोसतां प्रेमभरें ॥ आई लागीं पान्हा पाझरे ॥
मग तीच पूर्वील गुरगुरणें विसरे । प्रीतीनें पसरेक्षितीवरी ॥ १४ ॥
प्रेमोदयीं हरपे कंटाळा । चौपायीं कवटाळी दृढ निजबाळां ॥
वरचेवरी चाटी अवलीळा । काय तो सोहळा अलोलिक ॥१५॥
पोरांच्या तीक्ष्ण नखप्रहारें । जों जों मातेची ओंटी विदारे ॥
तों तों अधिक प्रेमाचे झरे । दुग्ध ओझरे बहुधारा ॥ १६ ॥
जैसी त्या बाळांची अनन्य भक्ति । मातेस करी दुग्धोत्पत्ति ॥
तैसीच तुमची साई पदासक्ति । द्रवील चित्तीं साईतें ॥ १७ ॥
एकदां हरिभक्ति परायण । गणुदासांचें सुश्राव्य कीर्तन ॥
कोपिनेश्वर संन्निधान । ठाणियाचे जन करविती ॥ १८ ॥

---

१ धीर, उतावीळ न होणें

पहलिया शिष्टांचा आग्रह । गणुदास करिती कथानुग्रह ॥
एका कवडीचा ही परिग्रह । किंवा दुराग्रह तेथें ना ॥ १९ ॥

कीर्तना नलगे देणें कवडी । तनु उघडी डोई न पगडी ॥
कासेसीं साधीच पंचे जोडी । अनिवार उडी श्रोत्यांची ॥ २० ॥

या पोषाखाची ही कथा । मौज वाटेल श्रवण करितां ॥
अवधारा ती स्वस्थ चित्ता । पहा आश्चर्यता बाबांची ॥ २१ ॥

एकदां गणुदासांची कथा । शिरडी ग्रामीं होणें असतां ॥
अंगरखा उपरणें फेटा माथां । पोषाख समन्विता निघाले ॥२२॥

शिष्टाचारानुसारता । आनंदें बाबांस वंदूं जातां ॥
वाहवा नवर देव कीं सजलासि आतां । बाबा वदतां देखिलें॥२३॥

जातोस कोठें ऐसा सजूनी । बाबा पुसती तयांलागुनी ॥
कीर्तन कराया जातों म्हणुनी । दास गणूनीं कथियेलें ॥ २४ ॥

पुढें बाबा वदती तयांस । अंगरखा उपरणें फेटा कशास ॥
किमर्थ केलास इतुका प्रयास । नलगती आपुल्यास तीं कांहीं ॥२५॥

काढ कीं तीं मजसमोर । कशास अंगावर यांचा भार ॥
तंव तीं तयांच्या अनुज्ञेनुसार । तेथेंच चरणाव ठेविलीं ॥ २६ ॥

तेंपासून उघडे सोज्वळ । हातीं चिपळी गळां माळ ॥
कीर्तन समयीं सर्वकाळ । गणूदास हा वेळपर्यंत ॥ २७ ॥

तऱ्हा ही जरी जनविरुद्ध । तरी ती अत्यंत पायाशुद्ध॥
कीं जो प्रबुद्धांचा प्रबुद्ध । नारद प्रसिद्ध हा मार्ग ॥ २८ ॥

ही नारदीय मूळ गादी । येथूनचि हरिदासांची मांदी ॥
बाह्य रंगाची न ज्यां उपाधी ॥ अंतःशुद्धि ध्येय ज्यां ॥ २९ ॥

अधोभागचि वस्त्राच्छादित ।। चिपळ्या वीणा वाजवीत ।।
मुखीं हरि नाम गर्जत । ध्यान विश्रुत नारदाचें ।। ३० ।।
साई समर्थाचे कृपेनें । स्वयें रचूनि संतांचीं आख्यानें ।।
मोलावीण करिती कीर्तनें । ख्याती तेणें पावले ।। ३१ ।।
उल्लहास साईभक्तीचा । दासगणूनें विस्तारिला साचा ।।
वाढविला साईप्रेमरसाचा । स्वानंदाचा सागर ।। ३२ ।।
भक्त शिरोमणी चांदोरकर । तयांचेंही अत्यंत उपकार ।।
साई चरण भक्ति विस्तार । कारण साचार हे मूळ ।। ३३ ।।
दासगणूचें इकडे येणें । एका चांदोरकरांच्या कारणें ।।
जागोजाग तयांचीं कीर्तनें । साईचीं भजनें चाललीं ।। ३४ ।।
पुणें नगर सोलापूरप्रांतीं । पूर्वींच महाराजांची ख्याती ।।
परी या कोंकणच्या लोकांप्रती । लाविली भक्ति या दोघीं ।।३५।।
मुंबई प्रांतीं जी साईभक्ति । तियेचें मूळ या दोन व्यक्ति ।।
साईमहाराज कृपामूर्ति । तयांचे हातीं प्रकटले ।। ३६ ।।
श्री कौपिनेश्वर मंदिरीं । साई कृपेच्या कीर्तनगजरीं ।।
हरि नामाच्या जयजयकारीं । उठली लहरी चोळकरां ।। ३७ ।।
हरिकीर्तना बहुत येती । श्रवणा श्रवणाच्या अनेक रीति ।।
कोणा आवडे बुवांची व्युत्पत्ति । हाव भाव स्थिति कवणा ।। ३८।।
कोणा आवड गाण्यापुरती । वाहवा बुवा काय हो गाती ।।
कायते विठ्ठल नामीं रंगती । कथेंत नाचती प्रेमानें ।। ३९ ।।
कोणास पूर्वरंगीं भक्ति । कोणाची कथाभागीं आसक्ति ।।
कोणास हरिदासी नकला रुचती । आख्यानीं प्रीति कोणास।।४०।।

बुवा प्राकृत कीं व्युत्पन्न । कीं पदपदार्थ बव्हर्थ संपन्न ॥
कीं केवळ उत्तररंगप्रवीण । कथा श्रवण ये परी ॥ ४१ ॥

ऐसे श्रोते बहुत असती । परी श्रवणें श्रद्धा भक्ति ॥
जोडे ईश्वर वा संत चरणीं प्रीति । ही श्रोतृस्थिति दुर्मिळ ॥४२॥

श्रवण केलें भाराभर । परी अविद्येचे थरावरथर ॥
तें काय श्रवणाचें प्रत्यंतर । व्यर्थ भाराभर श्रवण तें ॥ ४३ ॥

न घडे जेणेंनी मळ क्षाळण । त्यातें काय म्हणावें साबण ॥
करीन जें अविद्यानिरसन । तें काय श्रवण म्हणावें ॥ ४४ ॥

आधींच चोळकर श्रद्धाळू । आला साई प्रेमाचा उमाळू ॥
मनांत म्हणती बाबा कृपाळू । करा सांभाळू दीनाचा ॥ ४५ ॥

बिचारा गरीब उमेदवार । योसूं असमर्थ कुटुंबभार ॥
सरकार पदरीं मिळावा शेर । बाबांसी भार घातला ॥ ४६ ॥

नवस करिती कामुक जन । होईल जरी अभीष्ट संपादन ॥
तरी घालूं इच्छाभोजन । करूं ब्राह्मणसंतर्पण ॥ ४७ ॥

श्रीमंतांचें नवस वचन । म्हणती घालूं सहस्रभोजन ॥
अथवा करूं शतगोदान । मन कामना तृप्त होतां ॥ ४८ ॥

चोळकर आधींच निर्धन । नवस करावया झालें मन ॥
आठवूनि श्रीसाईचे चरण । दीन वदन तो बोले ॥ ४९ ॥

बाबा गरीबीचा संसार । नोकरीवर सारी मदार ॥
कायमचा व्हावया पगार । परीक्षा पसार हों लागे ॥ ५० ॥

---

या नांवाचा एक श्रद्धाळू गरीब गृहस्थ ठाण्याचे सिव्हिल कोर्टांत उमेदवार होता.

परिश्रमांतीं केली तयारी । पास होण्यावर भिस्त सारी ॥
नातरी गांठीची भाकरी । उमेदवारी जाईल ॥ ५१ ॥

झालों कृपेनें पास जर । होईन आपुले पायीं सादर ॥
वांटीन नांवानें खडीसाखर । हाच निर्धार पैं माझा ॥ ५२ ॥

एणें परी नवस केला । मनाजोगा आनंद झाला ॥
नवस फेडाया विलंब लागला । त्याग केला साखरेचा ॥ ५३ ॥

वाटेंत गांठीस कांहीं व्हावें । रिक्त हस्तें कैसें जावें ॥
आजचें उद्यांवर लोटावें । दिवस कंठावे लागले ॥ ५४ ॥

ओलांडवेल नाणेंघाट[1] । सह्याद्रीचा कडाही अफाट ॥
परी प्रापंचिका हा उंबरेघांट[2] । बहु दुर्घट ओलांडूं ॥ ५५ ॥

नवस न फेडितां शिरडीचा । असेव्य पदार्थ साखरेचा ॥
चहाही बिन साखरेचा । चोळकरांचा चालला ॥ ५६ ॥

जातां ऐसे कांहीं दिवस । आली वेळ गेले शिरडीस ॥
फेडिला तो केलेला नवस । आनंद मनास जाहला ॥ ५७ ॥

होतांच साईचें दर्शन । चोळकर घालिती लोटांगण ॥
वंदोनिया बाबांचे चरण । आल्हाद परिपूर्ण ते झाले ॥ ५८ ॥

मन करूनिया निर्मळ । वाटिती साखर अर्पिती श्रीफळ ॥
म्हणती आजी मनोरथ सकळ । झाले सफळ कीं माझे ॥ ५९ ॥

---

१ ठाणें जिल्ह्यांत मुरबाड तालुक्यांत या नांवाचा एक उंच घाट असून या वाटेनें कोंकणचे लोक देशावर जातात आणि देशावरील कोंकणांत उतरतात. या घाटानें पुणें जिल्ह्यांतील जुन्नरला कोंकणचे लोक जात येत असतात.

२ घराचा उंबरा।

आनंदले साई दर्शनें। सुख जाहले संभाषणें ॥
होते चोळकर जोगांचे पाहुणे। आलें जाणें जोगांकडे ॥ ६० ॥
जोग उठलें पाहुणे निघाले। बाबा जोगांस वदते झाले ॥
पाजी यास चहाचे प्याले। भले भरले साखरेचे ॥ ६१ ॥
खुणेचीं अक्षरें पडतां कानीं। चोळकर चमत्कारले मनीं ॥
आनंदाश्रू आले नयनीं। माथा चरणीं ठेविला ॥ ६२ ॥
कौतूक वाटलें जोगांना। त्याहून द्विगुण चोळकरांना
कारण ठावें तयांचें त्यांना। पटल्या खुणा मनाच्या ॥ ६३ ॥
चहा नाहीं बाबांस ठावा। येक्षणींच कां आठवावा ॥
चोळकरांचा विश्वास पटावा। ठसा उमटवा भक्तीचा ॥ ६४ ॥
इतक्याच पुरा दिला इशारा। कीं पावली बाबा दत्त शर्करा ॥
तुझ्या त्यागाचा नेमहीं पुरा। चोळकरा झालासे ॥ ६५ ॥
नवस वेळेचें तुझें चित्त। दीर्घसूत्रतेचें प्रायश्चित्त ॥
हें जरी तुझें ठेवणें गुप्त। तें मज समस्त कळलेंगा ॥ ६६ ॥
तुम्ही कोणी कुठेंही असा। भावें मजपुढें पसरितां पसा ॥
मी तुमचिया भावा सरिसा। रात्रंदिसा उभाच ॥ ६७ ॥
माझा देह जरी इकडे। तुम्हीं साता समुद्रापलीकडे ॥
तुम्हीं कांहींही करा तिकडे। जाणीव मजकडे तात्काळ ॥ ६८ ॥
कुठेंही जा दुनियेवर। मी तो तुम्हा बरोबर ॥
तुम्हा हृदयींच माझें घर। अंतर्यामीं तुमचे मी ॥ ६९ ॥
ऐसा तुम्हा हृदयस्थ जो मी। तयासीं नमा नित्य तुम्ही ॥
भूत मात्राच्याही अंतर्यामीं। तोच तो मी वर्ततों ॥ ७० ॥

यास्तव तुम्हास जो जो भेटे । घरीं दारीं अथवा वाटे ॥
ते ते ठायीं मीच रहाटें । मीच तिहीं त्यामाजी ॥ ७१ ॥

कीड मुंगीं जळचर खेचर । प्राणी मात्र श्वान शूकर ॥
अवघ्या ठायीं मीच निरंतर । भरलों साचार सर्वत्र ॥ ७२ ॥

मजशी धरूं नका अंतर । तुम्ही आम्ही निरंतर ॥
ऐसें मज जो जाणील नर । भाग्य थोर तयाचें ॥ ७३ ॥

दिसाया हे वार्ता तोकडी । परी गुणानें बहु चोखडी ॥
किती त्या चोळकरा गोडी । दिधली जोडी भक्तीची ॥ ७४ ॥

होतें जें जें तया अंतरी । तें तें बाबांनीं एणे परी ॥
दाविलें तयांस प्रत्यंतरीं । काय हे कुसरी संतांची ॥ ७५ ॥

बोलचि बाबांचे अणमोल । भक्त हृदयीं शिरती सखोल ॥
प्रेमाचे मळ्यास आणिती ओल । भक्तीस डोळ दाविती ॥ ७६ ॥

चातक तृष्णेच्या परिहारा । मेघ सदयता वर्षे धारा ॥
परिणामीं निवे अखिलधरा । तेच तऱ्हा हे झाली ॥ ७७ ॥

चोळकर विचारा कोठील कोण । निमित्तास दास गणूचें कीर्तन ॥
नवस करावया झालें मन । बाबाही प्रसन्न जाहले ॥ ७८॥

तेणेंच हा चमत्कार । कळलें संतांचें अंतर ॥
उपदेशार्थ बाबा तत्पर । ऐसे अवसर आणीत ॥ ७९ ॥

चोळकरांचें केवळ निमित्त । सकळ भक्तांचे साधावया हित ॥
अकल बाबांची कळा नित । विलोकीतचि रहावें ॥ ८० ॥

एसीच आणीक कळा वर्णून । मग हा अध्याय करूं पूर्ण ॥
कैसा एकें केला प्रश्न । कैसें तन्निरसन बाबांनीं ॥ ८१ ॥

एकदां बाबा मशीदींत । असतां आपुले आसनीं स्थित ॥
भक्त एक सन्मुख बैसत । ऐके चुकचुकत पाल एक ॥ ८२ ॥

पल्लीपतन पल्लीवचन । पुढील भविष्यार्थाचें सूचन ॥
सहज बाबांस करी प्रश्न । जिज्ञासासंपन्न होऊनी ॥ ८३ ॥

बाबाही पाठीसीं भिंतीवरी । किमर्थ ही पाल चुकचुक करी ॥
काय असावें तियेचे अंतरीं । अशुभकारी नाहींना ॥ ८४ ॥

तयास बाबा झाले वदते । पालीस आलें आनंद भरतें ॥
कीं औरंगाबादेहून येते । बहिण येथें भेटावया ॥ ८५ ॥

आधीं पाल तो जीव काय । तिला कैंचा बाप माय ॥
कैंची बहिण कैंचा भाय । संसार व्यवसाय काय तिये ॥८६॥

म्हणोनि बाबा हें कांहींतरी । बोलिले विनोदें प्रत्युत्तरीं ॥
ऐसें मानूनिया अंतरीं । स्वस्थ क्षणभरी बैसला ॥ ८७ ॥

इतक्यांत औरंगाबादेहून । गृहस्थ एक घोड्यावरून ॥
आला घ्यावया बाबांचें दर्शन । बाबा तें स्नान करीत ॥८८॥

तयास जाणें होतें पुढें । चंदी वांचून चालेना घोडें ॥
हरभरे विकत घ्यावया थोडे । बाजाराकडे निघाला ॥ ८९ ॥

पालीचा प्रश्न विचारणारा । साश्चर्य पाहे नव सौदागरा ।
इतुक्यांत त्यानें खाकेचा तोबरा । झटकला कचरा झाडावया॥९०॥

उपटी आपटतांच क्षितीवर । पाल एक पडली बाहेर ॥
घाबऱ्या घाबऱ्या धांवली सरसर । नजरेसमोर सकळांच्या ॥९१॥

प्रश्न पुसत्या बाबा वदती । आतां लक्ष ठेव तिजवरती ॥
पालीची त्या बहीण हीच ती । पहा चमत्कृती तियेची ॥९२ ॥

ती जी तेथून निघाली तडक । ताई करीत होतीच चुकचुक ॥
धरूनिया त्या अवाजावर रोख । चमकत ठुमकत चालली ॥९३॥
बहिणी बहिणीची ती गांठ । बहुतां दिसीं झाली भेट ॥
चुंबीती मुख आलिंगिती दाट । प्रेमाचा थाट अनुपम ॥ ९४ ॥
एकमेकीस घालीत गिरक्या । आनंदानें मारीत भिरक्या ॥
गेल्या उभ्या आडव्या तिरक्या । स्वच्छंद फिरक्या मारीत ॥९५॥
कोठें तें औरंगाबाद शहर । कोठें शिर्डी काय हा प्रकार ॥
कैसा यावा अवचित हा स्वार । पालही बरोबर तयाच्या ॥९६॥
असेल पाल औरंगाबादीं । असेल शिरलेली तोबऱ्या मधीं ॥
परी त्या प्रश्नोत्तरा संबंधीं । कैसी ही संधी पातली ॥ ९७ ॥
पाल काय चुकचुकावी । प्रश्न स्फूर्ती ती काय व्हावी ॥
अर्थोपपत्ती काय कथावी । प्रतीती यावी तात्काळ ॥ ९८ ॥
ऐसा हा योग अप्रतीम । विनोदावरी सार्वत्रिक प्रेम ॥
संत साधन योजूनि अनुपम । भक्त क्षेम वादविती ॥ ९९ ॥
पहा हा येथें जिज्ञासू नसता । अथवा कोणीही न प्रश्न पुसता ॥
कैसा साईचा महिमा समजता । कोणास कळता हा अर्थ॥१००॥
अनेक वेळीं शब्द करितां । अनेक पाली ठाव्या समस्तां ॥
कोण पुसे त्या शब्दाच्या अर्था । अथवा वार्ता तयाची ॥१०१॥
सारांष हा जगाचा खेळ । सूत्रें गुप्त आणि अकल ॥
कोणास व्हावी तरीही अटकळ । आश्चर्य सकळ करितात ॥१०२॥
उलट या पाली शब्द करितां । दर्शविती कीं अनर्थ सूचकता ॥
कृष्ण कृष्ण वाचे म्हणतां । टळते अनर्थता जन वदती ॥१०३॥

असेनाका कैसीही व्युत्पत्ति । परंतु ही काय चमत्कृती ॥
भक्त जडवावया निजपदा प्रतीं । उत्तम ही युक्ती बाबांची ॥ १०४॥
वाचील जो हा अध्याय आदरीं । अथवा नेमानें आवर्तन करी ॥
तयाचें संकट गुरुराय निवारी । खूण अंतरीं दृढ बांधा ॥ १०५ ॥
अनन्य भावें चरणीं माथा । जो जो वाही तयासीं तत्वता ॥
त्राता पाता अभयदाता । कर्ता हर्ता तो एक ॥ १०६ ॥
अंतर मानूं नका येथ । ऐसाच आहे हा साईनाथ ॥
निजानुभवाचा गुह्य भावार्थ । भक्त कल्याणार्थ मी कथितों ॥ १०७॥
जगीं संपूर्ण मीचि एक । दुजें न मजविण कांहीं आणीक ॥
नाहीं केवळ हाचि लोक । अखिल त्रैलोक्य मीचि मी ॥ १०८ ॥
ऐसें अद्वितीयत्व जेथें स्फुरें । तेथें भयाची वार्ताच नुरे ॥
निरभिमानें निरहंकारें । चिन्मात्र सारें भरलें ज्या ॥ १०९ ॥
हेमाडपंत साईशींशरण । सोडूं नेणे क्षण एक चरण ॥
कीं त्यांत आहे संसार तरण । गोड निरूपण अवधारा ॥ ११० ॥
पुढील अध्यायीं प्रसंग सुंदर । निर्माण करितील साई गुरुवर ॥
ब्रम्हज्ञान कैसें वाटेवर । चिटकीवारी जन मागे ॥ १११ ॥
कोणी एक लोभी जन । पुसेल साईसीं ब्रम्हज्ञान ॥
तें तयांचेच खिशांतून । देतील काढून महाराज ॥ ११२ ॥
श्रोतीं परिसतां हे कथानक । दिसून येईल बाबांचें कौतुक ॥
लोभ सुटल्यावाचून निष्टंक । ब्रम्ह निःशंक अप्राप्य ॥ ११३ ॥
कोण तयाचा अधिकारी । त्याचा कोणीही विचार न करी ॥

कोणा तें प्राप्त कैशियापरी । तेंही विवरतील महाराज ॥ ११४ ॥
मी तों तयांचा दासानुदास । पदर पसरितों करितों आस ॥
कीं हा साई प्रेम विलास । अति उल्हासें परिसा जी ॥ ११५ ॥
चित्त ही होईल प्रसन्न । लाधेल चैतन्य समाधान ॥
म्हणवून श्रोतां द्यावें अवधान । संत महिमान कळेल ॥ ११६ ॥

इतिश्रीसंतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । चोळकरशर्कराख्यानं नाम ॥

पंचदशोध्यायः

1462/56 ॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

PERSONAL LIBRARY OF SHRI C.B. SATPATHY



## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत टाकले जातात व ते ग्राहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील व त्यामुळें जर ग्राहकांना अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांनां पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरां येते. इतक्या उशिरां पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टप्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ नांदेड.

शिर्डी येथील

श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भीष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जाणारी पद्यें, व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनीं तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सीताराम दीक्षित

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण--श्री साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर.

५ टर्नर रोड, वांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर

---

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ टर्नर रोड वांद्रे येथें
प्रसिद्ध केलें.